नि.फौ.ख.क्र. ४७/२०२४
सरकार वि. दिपक
नि.क्र.१२ च्या खाली

साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–प्रितम राजु रोकडे,
वय:–२३ वर्ष, व्यवसाय–मजुरी
राह.सालेभट्टी, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी समन्सपत्र दिले होते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहीती आहे त्यास यापुर्वीच निशानी क्र. १० देण्यात आला. मी घटनास्थळावर गेलो होता. माझ्यासमक्ष पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला नव्हता. पोलिसांनी फक्त माझी सही घेतली होती. सहीपुरता **निशानी क्र.१३** देण्यात आला. पोलिसांनी माझे फोटो काढले होते त्यात माझा फोटो आहे त्याला यापुर्वीच आर्टीकल अ देण्यात आले. पोलिसांनी माझे बयाण घेतले नव्हते.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०४/०२/२०२४ रोजी मी मौजा सिर्सी येथे घटनास्थळावर गेलो व माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला मला वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष एक बाराचक्का टिप्पर व १० ब्रास रेती जप्त केली होती. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.श्री. सलिम शेख यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी सुचनापत्रावर फक्त सही केली आहे त्यामध्ये काय मजकूर लिहीला आहे याबाबत मला माहिती नाही.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि१८/०९/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड